**नियमित दिवाणी दावा क्र. २०९/2020 मधील नि.४१ खालील आदेश**
**बाबुराव बयाजी यादव वि. मा. जिल्हाधिकारी सो, सातारा**
**CNR NO. MHST050001292020**

प्रतिवादी क्र.२ याने कैफीयत व ताकीद अर्जास म्हणणे नि.४१ वर सादर केलेले आहे. परंतु सदरची कैफीयत ही मुदतीत नसल्यामुळे त्यावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. वादी यांनी म्हणणे दाखल करुन असे नमूद केले की, दि.२८.०२.२०२० रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. त्यानंतर ३० दिवसात कैफीयत देणे गरजेचे होते. सदरची कैफीयत दि.१०.१२.२०२० रोजी विलंब माफीचा अर्ज न देता दाखल केलेली आहे. त्यामुळे ती कैफीयत फेटाळण्यात यावी.

०२. सदरची कैफीयत विलंबाने दाखल केलेली आहे. ती दाखल करण्यापूर्वी विलंब माफीचा अर्ज दाखल करणे बंधनकारक होते. विलंब माफीचा अर्ज न्यायालयाने गुणदोषावर मंजूर केल्यानंतरच कैफीयत अभिलेखावर घेण्याची कायदेशीर तरतुद आहे. सदर बाबीची प्रतिवादी क्र.२ यांनी पुर्तता न केल्यामुळे ती कैफीयत, कैफीयत म्हणून अभिलेखावर घेता येणार नाही. त्यामुळे नि.४१ वरील कैफीयत फेटाळण्यात येत आहे व तसा आदेश नि.१ वर करण्यात येतो.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.02.12 17:06:31 +0530

ठिकाणः कराड ( जे.जे.माने )
दिनांकः १०.०२.२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.